
(13) Dr. Kailas Sawant (History)

# 21 व्या शतकातील जागतिक सुरक्षा आव्हाने



प्रो. डॉ. चंद्रकांत बंशीधर भांगे
श्री. देविदास विजय भोसले

# 21 व्या शतकातील जागतिक सुरक्षा आव्हाने

प्रो. डॉ. चंद्राकांत बंशीधर भांगे

श्री. देविदास विजय भोसले

**Swaranjali Publication**
swaranjalipublication@gmail.com,
8700124880, 9810749840
Vasundhara, Ghaziabad, 201012.

# अनुक्रमणिका


1. जागतिक शांततेसाठी शस्त्रास्त्रस्पर्धा थांबविणे काळाची गरज १-२

संशोधक- पल्लवी दाजी वाघ

&

मार्गदर्शक- डॉ. शिवाजी पाते, विभाग प्रमुख अर्थशास्त्र, संत तुकाराम कॉलेज, परभणी

2. न्यु डेव्हलपमेंट किंवा ब्रिक्स बँक ३-६

डॉ. मनिषा सयाजी सोडनवर, वाणिज्य विभाग, भैरवनाथ विज्ञान महाविद्यालय, खुटबाव

3. जागतिक राजकारणात सार्क राष्ट्रासमोरिल आव्हाने व भूमिका ७-११

प्रा. एस.एस. तायडे, मधुकरराव पवार कला महाविद्यालय, मुर्तिजापूर, जि. अकोला.

4. सार्क : प्रादेशिक सहकार्याची वाटचाल १२-१६

प्रा. डॉ. विलास आवारी, विभाग प्रमुख राज्यशास्त्र विभाग, के.जे. सोमैया महाविद्यालय कोपरगाव

5. निःशस्त्रीकरण : NPT आणि CTBT करारामध्ये भारताची भूमिका १७-२१

भालचंद्र नागनाथ बिचितकर, सहाय्यक प्राध्यापक, आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज, नागठाणे, सातारा

6. श्रीलंकेची भू-सामरिक स्थिती आणि महत्त्व २२-२५

श्री. रामकिशन सखाराम आवाड, संरक्षण आणि सामरिक शास्त्र विभाग, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.

&

प्रा. डॉ. बबन तोडकर, विभाग प्रमुख, संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभाग, न्यू आर्ट्स, कॉमर्स अन्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर

7. मानवी संघर्ष आणि सामूहिक सुरक्षितता २६-२८

प्रा. योगेश रामचंद्र गदादे, सहाय्यक प्राध्यापक व विभागप्रमुख, राज्यशास्त्र विभाग, कला व वाणिज्य महाविद्यालय, राहु, ता-दौंड, जि-पुणे

8. कोरोना महामारी आणि मानवी सुरक्षा २९-३३

डॉ. रंजना अरविंद शृंगारपुरे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, श्रीमती आर.एम. पटेल महिला कला महाविद्यालय, भंडारा

9. मानवी हक्क आणि भारतीय संविधान ३४-३६

डॉ. राम पांडूरंग साबदे, सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर, जि. लातूर

10. दहशतवाद : कारणे व उपाय योजना ३७-३९

प्रा. डॉ. ज्ञानेश्वर साहेबराव शिंदे, लोकप्रशासन विभागप्रमुख, सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव, जि.बीड

11. प्रादेशिकतावाद ४०-४५

डॉ. प्रवीण पांडुरंग लोणारकर, लोक प्रशासन विभाग प्रमुख, बी रघुनाथ महाविद्यालय, परभणी

12. नक्षलवाद भारतीय राजकीय व्यवस्थेसमोरील एक आव्हान ४६-४८

डॉ. रंजना अरविंद शृंगारपुरे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, श्रीमती आर.एम. पटेल महिला कला महाविद्यालय, भंडारा

13. नक्षलवाद्यांसाठी सुधारित आत्मसमर्पण योजनेचा चिकित्सक अभ्यास ४९-५३

बांगर आकाश शेषराव, संशोधक विद्यार्थी, आदर्श महाविद्यालय, हिंगोली

14. महिला सक्षमीकरण -भारतीय संविधानिक तरतूदी, योजनाबाबत जाणिवजागृती ५४-५८

प्रा.कल्पना एस.गोडघाटे राज्यशास्त्र विभाग प्रमुख, श्रीमती ना.वा.कला महा.यवतमाळ

15. महिला सक्षमीकरण ५९-६०

डॉ. प्रज्ञा एस. जुनघरे, गृह-अर्थशास्त्र विभाग, एफ.ई.एस. गर्ल्स कॉलेज, चंद्रपूर

16. राष्ट्रीय सुरक्षा : भारताची अंतर्गत व बाह्य सुरक्षेची आव्हाने ६१-६३

प्रा. डॉ. संजय गोरे , राज्यशास्त्र विभाग प्रमुख, शरदराव पवार महाविद्यालय, गडचांदूर जि. चंद्रपूर

17. भारत पाक संबंध व कश्मीर प्रश्न ६४-६७

डॉ. भीमाशंकर मधुसूदन डहाळके, सहाय्यक-प्राध्यापक राज्यशास्त्र विभाग, राजे रामराव महाविद्यालय जत

18. राष्ट्रीय सुरक्षा मध्ये एनसीसीची भुमिका ६८-७१

मेजर संजय धनसिंग चौधरी, दादा पाटिल महाविदयालय, कर्जत जि. अहमदनगर

19. छत्रपती शिवाजी महाराज यांचे लष्करी संघटन ७२-७६

डॉ. कैलास ज्ञानोबा सावंत, सहाय्यक प्राध्यापक,इतिहास विभाग प्रमुख, महिला महाविद्यालय,गेवराई ता.गेवराई जि.बीड

20. छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्यातील लष्करी व्यवस्था- ऐतिहासिक आढावा ७७-८२

डॉ. वंदना राजेश शिंदे, सहाय्यक-प्राध्यापक, इतिहास विभाग, खारेपाटण ता. कणकवली जि. सिंधुदुर्ग

21. १७ व्या शतकातील राष्ट्रीय सुरक्षे बाबत कान्होजी अंग्रेंची ची भूमिका – एक दृष्टीकोण. ८३-८५

श्री. मंगेश भगवंतराव कुलकर्णी, शिक्षक, राजर्षी श्री छत्रपती शाहू सैनिकी शाळा सगरोळी जि. नांदेड.

22. नक्षलवादाचा भारतीय समाज जीवणावरील परिणाम ८६-८७

प्रा.डॉ. केंद्रे एस.एम , समाजशास्त्र विभाग प्रमुख, श्री संत गाडगे महाराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लोहा ता. लोहा जि. नांदेड

23. भारत -चीन तणाव का वाढत आहे ८८-९२

श्री. देविदास विजय भोसले, विभागप्रमुख, संरक्षण आणि सामरिक शास्त्र विभाग, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.

&

प्रा. डॉ. चंद्रकांत बन्सीधर भांगे, विभागप्रमुख, सैन्य विज्ञान विभाग, श्री शिवाजी कॉलेज परभणी

# 19

## छत्रपती शिवाजी महाराज यांचे लष्करी संघटन

डॉ.कैलास ज्ञानोबा सावंत

प्रस्तावना :दि.19 फेब्रुवारी 1630 रोजी शिवनेरी किल्ल्यावर शिवाजी महाराजांचा जन्म आई जिजाबाई व वडिल शहाजी राजे भोसले यांच्या पोटी झाला. वयाच्या 17 व्या वर्षी मुस्लीम राजवटीच्या विरोधात लष्कराचे संघटन करुन इ.स.1646 मध्ये रायरेश्वरापुढे शिवाजी महाराजांनी मावळयांना बरोबर घेवून स्वराज्याची शपथ घेतली.1 अवघ्या मुठभर मावळयांच्या महकार्याने स्वराज्य उभारणी हा केवळ राज्य निर्माण करण्याचा उद्योग नव्हता तर सहयाद्रीच्या खोऱ्यात अन्याय अत्याचाराला तोंड देत जगत असलेल्या समाजाला मुक्ती मिळवून देण्यासाठी उभारलेला महायज्ञ होता. शिवाजी महाराजांनी सर्व क्षेत्रात स्वत: गुण कौशल्य प्राप्त केली. स्वराज्य उभारणी म्हणजे केवळ मूठभर धनदांडग्यांचे काम नसून समाजातील प्रत्येक घटकांचे योगदान मोलाचे आहे. याची जाणीव महाराजांनी ओळखली होती. महाराजांचे प्रशासन, युध्दतंत्र, कृषीप्रशासन, जलनियोजन सर्वच बाबींचा विचार केला तर सर्वक्षेत्रात सर्वोत्तम व्यवस्था होती. त्याचप्रमाणे शिवाजी महाराजांनी उभारलेली लष्करव्यवस्था असामान्य स्वरुपाची होती. लष्कराची उभारणी म्हणजे केवळ सैन्यात बाजार बुणगे, किंवा खोगीर भरती नव्हती. महाराजांच्या लष्करी धोरणाचा चिकित्सकपणे विचार केला तर असे लक्षात येते की लष्कर व्यवस्था पूर्णपणे गुण कौशल्यावर आधारित होती. लष्कर व्यवस्था निर्माण करतांना शिवाजी महाराजांनी वातावरणाचा परिसराचा व सहयाद्रीचा पुरेपूर अभ्यास केल्याचे दिसते.

शिवाजी महाराजांच्या अंगी अव्दितीय राजकीय सद्‌गुण भरलेले होते ते स्वधर्मनिष्ठ, स्वातंत्र्यप्रिय, पराक्रमी व धाडसी होते. शिपाईगिरीत त्यांची बुध्दीमता अव्वल दर्जाची होती. कोणत्याही प्रकारचा कठीण प्रसंग येवो, त्यात न डगमगता त्यातून मुक्तता करुन घेण्याचा उपाय सूचने हा सद्‌गुण त्यांच्या अंगी होता. त्यांना आपल्या लोकांविषयी प्रेम वाटे ते त्यांचा अभिमान बाळगीत त्यांना त्यांच्या कामगिरीबद्दल योग्य बक्षीस देत आणि जे योग्य व लायक असत त्यास श्रेष्ठ पदे देत असत. महाराष्ट्राचा अभिमान असलेला प्रत्येक मनुष्य ब्राम्हण, क्षेत्रीय, प्रभू, दलित, आदिवासी, बारा बलुतेदार, अठरा आलुतेदार, मुस्लीम इत्यादी समाजातील लोकांस त्यांनी हाताशी धरले. शिवाजी महाराज स्वदेश प्रितीने व स्वधर्मप्रीतीने प्रेरित झाले होते. तेंव्हा वाटेल ते नुकसान सोसण्याचे धाडस करुन त्यांनी आपल्या बुध्दीवैभवाने व पराक्रमाने स्वराज्य स्थापण्याचे ध्येय सिध्दीस नेले.2

हे राज्य उभे करीत असतांना जनतेच्या ऐहिक कल्याणाची जबाबदारी राज्याची आहे, हे ते कधी विसरले नाही. अनेक लढाया ते लढले पण प्रजेवर कधी नवे कर लादले नाहीत. "मी शत्रूशी शत्रू म्हणूनच वागलो, मित्रांना दगा दिल्याचे दाखवा." असे त्यांचे आव्हान होते.

कौल देऊन गावे वसविणे, शेतसारा निश्चित करणें, वतनदारीला आवर घालणे, किल्ल्यांची कोठारे भरुन ठेवणे, शेतकऱ्यांना बी-बियाणे, नांगर, अवजारे यासाठी कर्जाची सोय करणे, भाषा सुधारण्यासाठी प्रायश्चित देऊन हिंदू करुन घेणे, नवे किल्ले बांधणे, वीरांचे कौतुक आणि पंडितांचा सन्मान या सर्व बाबतीत सदैव दक्ष असणारा राजा म्हणजे शिवाजी महाराज इतिहासात ठायी ठायी आपणांस दिसतो. यामुळेच इतिहासकारांनी शिवाजी महाराजांची तुलना नेपोलियनशी केलेली आहे.

"He was Napoleon of alliences but unlike Napoleon he hever met his waterloo or Moscow."

शिवाजी राजे नेपोलियनपेक्षा श्रेष्ठ असल्याचे वर्णन आहे. त्यांनी स्वराज्य इतकेच प्रशासनालाही महत्त्व दिले होते.

शिवाजी महाराजांचे लष्करी प्रशासन :

शिवाजी महाराजांनी हिंदू धर्माचे रक्षण करणारे मराठयांचे जे राज्य स्थापन केले. त्यात त्यांच्या लष्कराचा सिंहाचा वाटा आहे. जर बलवान सैन्यच नसेल तर राज्य, धन, पराक्रम हे निरर्थक ठरतात त्यातून काही माध्य होत नाही असे प्राचीन काळातील शुक्रनितीच्या वचनाचे सुत्र शिवछत्रपतींनी आपल्या लष्करी व्यवस्थेत प्रयत्नपूर्वक राबविले.

शिवाजी महाराजांनी आपली जी लष्कर व्यवस्था उभी केली ती पूर्णपणे नवी होती. परंतु परपरांगत लष्करातील दोष दूर करुन त्यास नवे स्वरुप दिले होते. त्यामुळे लष्करास नेहमी विजय मिळत असे शिवाजी महाराजांच्या लष्करांची काही वैशिष्टये होती.

1) शिवाजी महाराजांनी जहांगिरी पध्दतीऐवजी नव्या लष्कर व्यवस्थेची उभारणी केली. कारण जहगिरदार राजाकडून मिळालेल्या जहाँगिरीत दरवर्षी वसुलीचे काम करीत. त्यातून जो पैसा जमा होत असे त्यापैकी फार कमी पैसा सरकारात भरीत असत. अशी भ्रष्ट जहागिरी पध्दत दोषास्पद असल्याने ती नष्टप्राय करुन त्यातून निष्ठावान लष्कराची निर्मिती झाली.

2) प्रत्यक्ष लष्कर भरती करत असत, ते करतांना सैन्याची योग्य पध्दतीने निवड करीत असत. त्यांनी सुरुवातीला जी सेना उभारली ती प्रामुख्याने मावळयांची होती. लष्करात योग्य सेनापती, सरनोबत अशी अधिकारपदे निर्माण केली व त्यावर योग्य व्यक्तिंच्या नेमणूका केल्या. तसेच घोडदळ व पायदळ या दोन्ही दलात अधिकाऱ्यांची विविध पदे निर्माण केली व त्यानुसार पगार ठरविले.

3) त्यांनी लष्करातील लोकांच्या रोख पगारावर नेमणूका केल्या. त्यामुळे नियमित पगार मिळत असल्याने लष्कराच्या मनात आपल्या राजाविषयी निष्ठा व प्रेम वाढीस लागले.

4) शिवाजी महाराजांनी केवळ परंपरागत शिक्षणाच्या आधारावर अवलंबून न राहता त्यांना नियमित लष्करी शिक्षण मिळेल. यासाठी जाणीव पूर्वक प्रयत्न केले. त्यामुळे मध्ययुगीन इतिहासातील शिवाजीराजे हे अशा प्रकारे लष्करी प्रशिक्षण देणारे एकमेव राजे असावेत. एवढेच नव्हे तर लष्करी प्रशिक्षणावरोबरच उत्कृष्ट प्रकारचे लष्करी साहित्य असण्याचे महत्त्व राजांनी ओळखून पोर्तुगीज, फ्रेंच इंग्रज यांच्याकडून दारुगोळा व उत्कृष्ट तोफखाना मिळावा यावर भर दिला होता.

शिवाजी महाराजांच्या लष्कराची रचना :

1) राज्याच्या लष्करी व्यवस्थेचे छत्रपती हे प्रमुख असत. त्यांच्या हुकूमानुसार युध्दमोहिमा आखल्या जात. लष्करी तह आणि करारनामे करतांना छत्रपतींना विशेष महत्त्वाचे स्थान असे.

2) राज्यांच्या संरक्षक दलात निष्ठावंत व पराक्रमी सैनिकांची भरती केलेली असे म्हणजेच, "लाख मरोत पण लाखाचा पोशिंदा उरो" असे म्हटले गेले आहे. माणूस जसजसा अधिक कर्तबगारी बजावतो तसतशी त्याच्या गुप्त शत्रूंशी संख्या वाढत जाते. त्यास नष्ट करण्यासाठी कपटनितीचा अवलंब केला जाण्याची शक्यता असते. सत्ता व संपत्ती बळकावण्यासाठी तत्कालीन मुस्लीम सत्तेत विश्वासघाताने खुन व विष प्रशासनसारख्या घटना वारंवार होत असत. जन्मदात्या आईनेही सत्तेच्या हव्यासापोटी आपल्या मुलावर विषप्रयोग केले आहेत. यासाठीच राजांच्या रक्षणासाठी संरक्षक दल उभारणे आवश्यक वाटू लागले हे संरक्षक दल आणीबाणीच्या प्रसंगी राखीव सैन्य म्हणून देखील वापरले जाई. यामध्ये बंदुकधारी, भालेकरी, हलकी हत्यारे चालविणारे, तोफखाना बाळगणारे इत्यादी असत.



१३४

शिवाजी महाराजांनी स्वराज्य वृध्दीसाठी ज्या युध्द मोहिमा हाती घेतल्या त्या प्रामुख्याने सह्याद्री व विंध्य अशा डोंगराळ प्रदेशात, त्यामुळे गड घेणे, गड लढविणे, वेढा घालणे, उठविणे आणि त्यातून गनिमी काव्याचे तंत्र यशस्वी करण्यासाठी घोडदळापेक्षा त्यांना अत्यंत उपयुक्त ठरले. पायदळात मुख्यत: मावळे असत.

शिवाजी महाराज यांची लष्करी व्यवस्था :

1) अंगरक्षक : शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापन करतांना कोणाचे अनुकरण केले नाही. आदिलशाही, कुतुबशाहीत सरंजामशाही पध्दत होती. त्यापेक्षाही वेगळी नवीन शासन पध्दती उभारली,अतिशुर लढय्ये त्यांचे शरीर संरक्षक होते. उदा.- जिवा महाला, त्यांच्या आपल्या सैन्यावरती विश्वास होता. इ.स.1664 च्या सुरत लुट व अक्रमनानंतर इनायतखानच्या सुभेदाराने शिवाजी महाराजांवर हल्ला केला. त्यावेळी शरीर रक्षकांचे त्याचे हात वरच्यावर छाटले. उत्तम संरक्षक व निष्णात त्यांचे सैनिक होते.

2) घोडदळ : घोडदळांत बारगीर व शिलेदार असे दोन प्रकार होते. बारगीरांच्या घोडदळास पागा म्हणत असत. या पागेतील सगळी घोडी सरकारची असून त्यांचा खर्च ही सरकारकडून केला जात असे. शिलेदारांच्या घोडदळांतील घोडी प्रत्येक शिलेदाराने आपापली आणावी व त्यांची जोपासना ज्यांनी त्याने करावी असा निर्बंध असे. याबद्दल त्यास घोडयाचा र[illegible]व शिवाय पगार सरकारातून रोख मिळत असे. 25 घोडास्वार व 16 हवालदार यास वेतन 10 होन असे. 5 हवालदार व 1 जुमलेदार यास 500 होन वेतन मिळत असे. तसेच 5 हजारीवर व 1 पंच हजारी यास 1000 होन दिले जात असे. सर्व पंचहजारीवर सेनापती सर्व सैन्यांना प्रतिपदीच्या दिवशी होनव्दारे वेतन दिले जात असे. हे शिलेदारांचे घोडदळ ठेवण्याची पध्दत यवन पादशाहीतील होती. ती शिवाजी महाराजांस फारशी आवडत नसे. कारण अशी घोडी रहावीत तशी हुशार राहत नसत व कोणी शिलेदार चाकरीस कंटाळला असता तो आपल्या घोडयासह निघून जाण्याचा संभव असे. यासाठी या शिलेदारांची संख्या कमी करण्याचे शिवाजी महाराजांचे धोरण नेहमी असे. अशी शिलेदारी करुन उदर निर्वाह करणाऱ्या लोकांची संख्या त्याकाळी पुष्कळ असल्या कारणाने महाराजांस त्यांना नोकरीस ठेवणे प्राप्त असे. पावसाळयामध्ये घोडयास ठेवण्याकरीता पागा बांधलेल्या असत. त्या ठिकाणी घोडयास ठेवून त्यांचा व स्वारांचा खर्च सरकारांतून होत असे. मुगीच्या दिवसात घोडदळाने आपला खर्च शत्रूच्या प्रदेशातुन भागवावा.3 इ.स.1680 दरम्यान खास 80000 स्वार होते व शिलेदार पागेत 25000 होते. एकूण 1,05,000 घोडदळ होते.4

3) प्रशिक्षण : त्यावेळी ग्रामव्यवस्थाच अशी होती की लोकांना सैनिकी शिक्षण घरीच मिळत असे. पाटील गांवच्या सुरक्षिततेसाठी जबाबदार असे. लोक गावांभोवती गस्त घालत. जंगली जनावरांचा बंदोबस्त करावा लागे. तेंव्हा [illegible]लाठी, धनुष्यबाण, भाले, कोयते वापरणे सर्वांना येई. गावांत तालमी, देवळे असत. तिथे कुस्ती व्यायामाबरोबर तलवार, दांडपट्टा, जांबिये यांचे शिक्षण मिळे. पूर्वी वतनदार असे लोक तयार करत व जरुर असेल तेंव्हां ते घेवून कामगिरीवर हजर होत. आता असे लोक शिवाजी महाराजांनी नेमलेल्या अधिकाऱ्यांच्या हाताखाली राहत. पूर्वी बाजी पासलकरांकडे असे लोक व सैन्य असे. एक पाटील 6 रुके रोजाप्रमाणे 10 लोक घेऊन शिवाजी महाराजांच्या सैन्यात लढण्यापुरते यावयास तयार होत. या सैन्यास राहण्याची व्यवस्था निराळी करण्याची जरुरी. गरज भासत नसे. असे लोक तालमी देवळात राहत हे लोक घरीच राहत असल्यामुळे हा भार पण फार नसे.5

4) पायदळ : मावळे हेरकरी, हेटकरी यांची भरती यात होती. गनिमीकावा पध्दती (गोरिला युध्द पध्दती) योग्य होती. जंगलात, रानात, वनात ते लढण्यास तरबेज होते. याव्यतिरिक्त शत्रूच्या सैन्यास चकविणाऱ्यात तरबेज होते. बाजीप्रभू, तानाजी मालुसरे, उत्तम योध्दे असल्याची उदाहरणे प्रसिध्द आहे. त्यांनी तोफा, तलवार, भाला यांचे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली होती. 10 सैनिक = 1 नाईक, 5 नाईक = 01 हवालदार, 3 हवालदार = 1 जुमलेदार, 8 जुमलेदार = 1

हजारी, सर्व हजारी = 1 सेनापती शिवाजी महाराजांकडे इ.स.1680 मध्ये 100000 लाख पायदळ सैन्य होते.6 चणे,चटणी,कांदा, भाकर हे प्रमुख मुख्य अन्न होते. शिवाजी महाराजांचे सैनिक प्रामाणिक होते. त्यांनी कधीही लुटमार केली नाही. प्रजेवर अत्याचार केले नाही, स्त्रियांना त्रास दिला नाही. गरीबांना त्रास दिला नाही. जिंकलेला सर्व पैसा अडका सरकारी तिजोरित जमा करत असत. शौर्य काटकपणा यावर त्यांची निष्ठा होती. प्रामाणिकपणा व विश्वास तसेच महाराजांप्रती निष्ठा स्वराज्य प्रती प्रेम यावर सैन्य जीवन जगत होते. इतिहासकार व्हिन्सेंट स्मिथ म्हणतो, 'औरंगजेबाचेच जे हाल मराठी सैन्यामुळे झाले तेच अकबर समोर आला असता तर झाले असते. पण ती वेळ आली नाही. औरंगजेबाला कधीच मराठी सैन्याला जिंकता आले नाही.

5) शिस्त : महारांज शिस्तीचे भोक्ते होते. धर्माच्या आदर करावा. लुट करु नये, सर्वांना हिशोब धावेत, गायी मारु नये, स्त्रियांना लहान मुलांना त्रास देऊ नये, त्यांचा आदर करावा. सर्व नियम पाळावेत. शिक्षा करण्याची सुध्दा तरतूद होती. त्यामुळे कोणी नियम मोडत नव्हते हे मुस्लीम राजवटीत नव्हते.

6) हेर यंत्रणा : शिवाजी महाराजांची हेर यंत्रणा प्रसिध्द होती. राज्य कारभार त्याशिवाय चालत नाही, 200 हेर महाराजाजवळ होते. वेषांतर करुन स्वत: शिवाजी बनल्याची बरीच उदाहरणे आहे. महाराज स्वत: वेषांतर करुन हेरगिरी करीत. फ्रेंच गव्हर्नर मार्टिनच्यामते महाराज रोख रक्कमा देऊन, बक्षिस देवून हेर प्रामाणिकपणे बातम्या, गुप्त बातम्या शत्रूच्या गोटात शिरुन आणत असत.

7) शस्त्रात्रे : तलवार, कट्यारा, जमदाडा, पटटे, भाले, वांक, विचवे, सैन्य, टाकऱ्या, निकमन, बंदुका, बरवतरे, धुंग्या, टोप, दुपटट चिखलते, पारवटा, ताज, डके, दारुगोळा, बावड, तोफा इत्यादी शस्त्रे प्रसिध्द होती. त्याच्या सहाय्याने गनिमी पध्दतीने शत्रूला जेरीस आणत असत. शत्रूचा दारुगोळा लुटने, त्यांचे अन्नधान्य लुटने यामुळे शत्रू पटकन ताब्यात येत असे. महाराजांनी इंग्रज, पोर्तुगी ।, फ्रेंच यांच्याकडून शस्त्र खरेदी केल्याची उदाहरणे सापडतात.

8) उंटदल व हत्तीदल : उंट व हत्ती यांचे सैन्यदल युक्त महाराजांनी उभारले होते. 1260 हत्ती व 1000 उंट महाराजांकडे होते. सामान वाहतुक, सैन्य वाहतुक, धान्य वाहतुक, चारा पाणी, शस्त्र वाहून नेणे त्यांचा उपयोग करुन घेतला जात असे. युध्दात सैन्य वाहून नेण्यासाठी या प्राण्याचा उपयोग केला जात असे. त्यांची निगा राखली जात असे.

9) दुर्ग व्यवस्था : शिवाजी महाराजांनी मावळ प्रांतातील दऱ्याखोऱ्यापर्यंत मुलूख मावळयांचे सैन्य उभारुन कब्जा केला व स्वराज्य विस्ताराबरोबरच त्या त्या भांगातील जुन्या किल्यांची डागडूजी केली व मोक्याच्या रस्त्यावर गडकोट बांधून कोकणातील आपल्या स्वराज्य संरक्षणाची कायमची व्यवस्था केली.7 तोरणा गडापासून स्वराज्याचे तोरण महाराजांनी बांधले. किल्ले हे लष्करी सामर्थ्याचे प्रतीक होते. त्यावरुन आजू-बाजूच्या 50 ते 60 मैलाचा कारभार पाहिला जात होता. महाराजांजवळ 310 किल्ले होते. त्यातील 111 किल्ले स्वत: त्यांनी बांधले होते. किल्ले हे सर्व सोयीयुक्त असत. इ.स.1671 मध्ये किल्ले संरक्षणावर 1,75,000 होन खर्च होत होता. प्रत्येक किल्यावर 200 ते 300 सैनिक राहत होते. किल्ले म्हणजेच शिवाजी महाराजांचे स्वराज्य होते.

10) आरमार : सागरी किनाऱ्यावर युरोपियन लोकांना शह देण्यासाठी त्यांनी अनेक किल्ले समुद्रात बांधले. इ.स.1658 पासून आरमाराची बांधणी केली. गुराव, गलवत, सिबाळ तरांडी, तालू, पगार, तीरकटी माछवा इत्यादी जहाजे प्रकार त्यांनी तयार केले होते. जलदुर्ग सारखा अभेद्य किल्ला त्यांनी समुद्रात बांधला. दर्यासारंग नावाचा अधिकारी प्रत्येक किल्यावर त्यांनी नियुक्त केला होता. सैनिकांना वेतन व बक्षिस दिले जात होते.

सारांश :



-240

शिवाजी महाराजांनी स्वराज्यामध्ये लष्कराचे संघटन करून सामर्थ्य वाढविले. वेगवेगळया लढाया त्यांनी [illegible]वर जिंकल्या. गनिमी कावा पध्दत यासाठी वापरली. योग्य निती व प्रामाणिकपणा हे त्यांचे लष्करी कौशल्याचे प्रमुख वैशिष्ट्ये होते. स्वत: युध्दात सहभाग घेतल्यामुळे सैन्याला स्फूरण चढत असे. त्यामुळे यश त्यांच्या पदरात पडत असे. शत्रूला नमोहरण करण्यामध्ये त्यांचा हातखंडा होता. शिवाजी महाराज त्यामुळे सर्वांना आदरणीय होते.


संदर्भ :

1) त्रैमासिक, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे,खंड-71, नं.1-4, जुलै 1992 ते एप्रिल 1993, पृष्ठ 9

2) गुजर मा.वि.,संस्थान देवास, (थोरली पाती), पवार घराण्याचा इतिहास,भाग-1, 1948, पृष्ठ 11

3) टिकेकर श्री.रा., सरदेसाई स्मारक ग्रंथ, मुंबई, 1938, पृष्ठ 97

4) कित्ता, पृष्ठ 98

5) त्रैमासिक, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, उपरोक्त, पृष्ठ 8

6) टिकेकर श्री.रा.,सरदेसाई स्मारक ग्रंथ, उपरोक्त,पृष्ठ 98

7) कुलकर्णी अ.रा. व खरे ग.ह., (संपा), मराठयांचा इतिहास, खंड-1, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर,पुणे, 1984, पृ. 98